Office of the Supdt. Of Police, Amravati Rural
**पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण यांचे कार्यालय.**
कार्यालय पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण कॅम्प रोड, अमरावती- 444602
दुरध्वनी क्रमांक- 0721-2665800 फॅक्स क्रमांक- 0721-266553
ई-मेल आयडी sp.amravati.r@mahapolice.gov.in

क्रमांक :- पोअअग्रा/आस्था-११/पो.भ.२०२२-२३/ 6607 /२०२४, अमरावती ग्रामीण दिनांक :- २६.०७.२०२४

2 6 JUL 2024

# प्रेस नोट

पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण आस्थापनेवर 198 पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रीया सुरू असून पोलीस शिपाई पदाची लेखी दिनांक 28.07.2024 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रो.राम मेघे इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च व राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग अँड मॅनेजमेंट (नवीन), अंजनगाव बारी रोड, नवीन बायपास, अमरावती येथे घेण्यात येणार आहे.

पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेकरीता येणाऱ्या उमेदवारांनी खालील नमुद सुचनेचे पालन करणे आवश्यक आहे.

१) उमेदवारांनी नियोजित वेळेच्या ३ तास अगोदर परीक्षा केंद्रावर हजर राहणे आवश्यक आहे.
२) उमेदवारांना पॅड व काळा पेन पुरविण्यात येणार आहे. उमेदवारांनी महाआयटी कडून मिळालेले लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र तसेच २ पासपोर्ट साईज फोटो सोबत आणने आवश्यक आहे.
३) उमेदवारांना परीक्षा केंद्रावर पुस्तके, नोंट्स, तत्सम शैक्षणिक साहीत्य, मोबाईल फोन, स्मार्ट वॉच, ब्ल्युट्युथ हेडफोन, स्पाय कॅमेरा, इलेक्ट्रॉनीक गॅजेट इत्यादी साहीत्य वापरण्यास बंदी असल्याने ते उमेदवाराने सोबत बाळगल्यास त्यास भरती प्रक्रीयेतून बाद करून त्यांचे विरुद्ध कायदेशिर कारवाई करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
४) उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये बॅग, सॅक नेण्यास बंदी असल्याने त्यांनी मोबाईल व मौल्यवान वस्तू सोबत आणू नये. आणल्यास त्या मौल्यवान वस्तूची संपूर्ण जबाबदारी ही स्वतः उमेदवाराची राहील.
५) उमेदवार परीक्षा कक्षामध्ये अथवा परीक्षा कक्षाबाहेर कोणताही गैरप्रकार करतांना आढळल्यास त्यास भरती प्रक्रीयेतून बाद करून त्याचे विरुद्ध कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
६) उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर तसेच परीक्षा कक्षामध्ये पर्यवेक्षकामार्फत देण्यात येणाऱ्या सुचनांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील.

**विशाल आनंद (भा.पो.से.)**
पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण

प्रत,

मा. संपादक
दैनिक-------------------------------